
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १५७५
१९६२



REFBK-0012760
REFBK-0012760

# द्राक्षवेल

सी. पु. वालावलकर

# 'द्राक्षवेल'

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम 33545 वि: ८५५—
क्रमांक 94504 नों दि ३१५
REFBK-0012760

कवि

सीताकान्त पु. वालावलकर

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 92060
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

'कोंकण–वैभव' प्रकाशन
२।४ टोपीवाला लेन, मुंबई नं. ७.

प्रकाशक :

**रावजी लक्ष्मण सामंत**

२/४ टोपीवाला लेन,

मुंबई ७.

■ ■

सर्व हक्क प्रकाशकाधीन

■ ■

**किंमत १॥ रु.**

■ ■

मुखपृष्ठ :

**अनील आर्टस्**

८ विश्वकर्मा भुवन

दादर, मुंबई २८.

■ ■

मुद्रक :

**चिंतामण वामन जोशी**

माधव प्रिंटिंग प्रेस,

अलिबाग–कुलाबा.

## अर्पण पत्रिका

ज्यांचं
आभाळाएवढं
ऋण मी
दंवबिंदूइतकंसुद्धां
फेडूं शकलों नाहीं,
त्या माझ्या
स्वर्गवासी वडिलांच्या
पवित्र स्मृतींस—

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
अनुक्रम ... वि:
क्रमांक ... नों. दि.

# सुरवाती पूर्वी....

कवित्व ही एक श्रेष्ठ कला आहे. द्राक्षवेल ह्या काव्य-संग्रहाचे निर्माते श्री. सी. पु. वालावलकर हे एक तरुण व प्रतिभासंपन्न कवि आहेत. ह्या संग्रहांत समविष्ठ केलेल्या त्यांच्या कविता अनेक मासिकें, साप्ताहिकें व दैनिकें यामधून प्रकाशित झाल्या आहेत. त्यामुळें त्या वाचकांच्या वाचनांत आलेल्या आहेतच; परंतु अशा विखुरलेल्या साहित्यानें त्या लेखकाच्या प्रतिभेची खरी कल्पना येत नाहीं. ती अशा संग्रहानें पुरी होते. हा काव्यसंग्रह प्रकाशित करण्याच्या दृष्टीनें आम्हीं बऱ्याच प्रकाशकांशीं बोलणीं केलीं परंतु हल्लीचे प्रकाशक फक्त शालेय पुस्तकं किंवा ज्यामुळें फायदा होईल अशा प्रसिद्ध लेखकांचीच पुस्तकें प्रकाशित करीत असल्यामुळें आमचा हा प्रयत्न अयशस्वी ठरला. शेवटीं आम्हींच आमच्या 'कोंकण वैभव' तर्फे हें पुस्तक प्रकाशित करण्याचें ठरविलें. आमच्या प्रकाशनातर्फे प्रकाशित होणारें हें दुसरें पुस्तक. प्रस्तुत काव्यसंग्रहाचे कवि श्री. वालावलकर हे कोंकणचे रहिवासी आहेत. नव्या व होतकरू लेखकांना प्रोत्साहन देण्यासाठीं 'कोंकण वैभवतर्फे' अशीच प्रकाशनें प्रकाशित करण्याचा मानस आहे.

'द्राक्षवेल'ची छपाई सुबक व आकर्षक व्हावी म्हणून माधव प्रिंटिंग प्रेसचे मालक श्री. चिंतामणराव जोशी व कामगार यानीं मेहनत घेतली. त्याचप्रमाणें दादरचे 'अनील आर्टस्' यानीं सुंदर मुखपृष्ट करून दिलें. या दोघांचेहि उभारी आहोंत.

— प्रकाशक.

# कवीचें हृद्गत्...

'द्राक्षवेल' हा माझा पहिलाच कविता संग्रह तो पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्याचें धाडस आज मी केलें आहे. वाचक वर्ग ह्या धाडसाचं कसंकाय स्वागत करतो त्याकडे आतां माझे डोळे लागले आहेत.

शारदेच्या दरबारांत आज मराठी भाषेला बहुमान मिळतो आहे. तिचे भक्तगण रोज नवेनवे अलंकार तिच्या अंगावर चढवीत आहे. तिच्या पायाशीं नजराण्यांचा ढीग पडतो आहे. आलेल्या नजराण्यांची, तिथें जमलेल्या भक्तगणांत पारख होते आहे, तर येणाऱ्या नजराण्यांचा मोठ्यानें पुकारा होतो आहे. मी हें सारं दूर उभा राहून पहात होतों. मनांत सांठवित होतो. मलासुद्धां वाटत होतं कीं आपणही त्या भक्तगणांत सामील व्हावं, आपलासुद्धां एक छोटासा नजराणा, अलंकार माझ्या मराठी भाषेला अर्पण करावा. पण माझा तो नजराणा अव्हेरला तर जाणार नाहीं ना? तेथें जमलेल्या भक्तगणांत त्या नजराण्याची कुचेष्टा तर होणार नाहीं ना? व्यवहाराच्या तराजूंत तो अलंकार तोलला तर जाणार नाहीं ना? मधांत मोहोळ बांधण्याआधीं शंकाकुशंकांच्या शेंकडों मधमाशा माझ्या अंगाला डंसत होत्या. शेवटीं मी हें धाडस केलं. शबरीनं रामाला बोरं अर्पण केलीं—भक्तीनं ओथंबलेली—निस्वार्थी निर्मळ हृदयानं. त्याचप्रमाणं माझी ही 'द्राक्षवेल' मी मराठी भाषेला अर्पण करीत आहे—शबरीच्याच हातानं.

कोंकण वैभवचे संपादक श्री. रा. ल. सामंत यानीं प्रकाशनाच्या बाबतींत खूपच मेहनत घेतली. त्यांचा मी आभारी आहे. कविता लिहिण्याच्या बाबतींत मला वेळोवेळीं प्रोत्साहन देणारे माझे वडील मित्र सुधाकर सामंत यांचा मी असाच स्नेह इच्छितों.

**—सीताकांत पुरुषोत्तम वालावलकर**

# प्रस्तावना....

गेल्या कांहीं वर्षांत मराठी कविता ही वादाचा विषय बनली आहे. जुनी कविता विरुद्ध नवी कविता आणि नवी कविता विरुद्ध अतिनवी कविता असे अनेक वाद रंगले. जुनी कविता ही कविताच नव्हे, येथपासून तों नवी कविता हीहि कविताच नव्हे असें म्हणण्यापर्यंत ह्या वादाची मजल गेली. पण ह्या वादाच्या वादळांत कविंचा एक वर्ग असा राहिला कीं तो वाद न करतां कविता करीत राहिला.

कविता जुनी किंवा नवी हा वाद होऊं शकत नाहीं, असें मला वाटतें. वादच करावयाचा तर कविता चांगली किंवा वाईट ह्या मुद्यावर व्हावा. मग ती नवी असो, किंवा अतिनवी असो, किंवा जुनी असो. कविता वाचून मन प्रसन्न झालें पाहिजे. हा प्रसन्नपणा शब्द, कल्पना, प्रतिभेची झेप, नादमाधुर्य, लय, या सर्वांतून निर्माण होतो. प्रसन्नपणामुळें मनाला आनंद होतो. अशी कविता मनांत घर करून राहते.

तेव्हां माझ्या मतें नव्यानें कविता लिहिणाऱ्यांनीं जुन्या व नव्या कवितेच्या वादांत न पडतां चांगली कविता लिहिण्याचा निर्धार करावा.

श्री. वालावलकर यांच्या कवितांचा पिंड कांहींसा असाच आहे, याबद्दल समाधान वाटतें. हा त्यांचा पहिलाच कविता संग्रह आहे. आणि त्यामुळें त्यांच्या कवितेबद्दल फार मोठ्या अपेक्षाहि कुणी बाळगीत नाहीं. कारण पहिली चाल ही जरा अडखळणारीच असते. तथापि त्यांच्या कवितेंत पुढेंमागें रसरशीतपणा व प्रसन्नपणा येऊं शकेल याची कांहीं चिन्हें त्यांच्या या संग्रहांत दिसत आहेत. कांहीं कविता

आणि कांहीं ओळी त्यादृष्टीनें रसाळ आहेत. या संदर्भांत 'दान' ह्या कवितेंतील–

एक डोळा जग पाहो
दुजा मेलेला राहूं दे
ऊणीवेच्या जाणीवेनें
तुझा आठव होऊं दे

ह्या ओळी किंवा "मी माझा शिल्पकार झालों", "हवे मला लाख हात", "एकटा", "पाय फुटले डोळयांना" ह्या कवितांचा उल्लेख करतां येईल.

अर्थात् अजून त्यांचे स्वतःचें काव्य-व्यक्तिमत्व फुलावयाचे आहे. सध्याची त्यांची बरीचशी कविता कांहीं मोठया कवींच्या सावलींतून चालत आहे. तिला स्वतःचें पंख फुटतील असे या कविता–संग्रहावरून जाणवते.

श्री. वालावलकर यांच्या काव्यांत प्रसाद, रसाळ शब्द-रचना, कल्पना चातुर्य, सामाजिक जाणीव, अनुभवाची वेदना, या गोष्टी आहेत. रचनेंतील सफाईही चांगली आहे. या गुणांची जोपासना व विकास योग्य प्रकारें होईल, अशी आशा आहे.

६ जुलै १९६२

—वसंत सबनीस

९९६२

# अनुक्रम :


| | | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ द्राक्षवेल | ... | ९ |
| २ सुदामा | ... | १० |
| ३ वीर कथा महाराष्ट्राची | ... | ११ |
| ४ माती मराठी मोलाची | ... | १३ |
| ५ माझा फाटलेला गळा | ... | १४ |
| ६ पांचा पांडवांची मूठ | ... | १५ |
| ७ दान | ... | १६ |
| ८ कांठ ओलावे परंतु– | ... | १७ |
| ९ आवडला देवाला तूं रे | ... | १८ |
| १० घागर | ... | १९ |
| ११ जीवन माझें | ... | २० |
| १२ लाट दूर दूर फुटे | ... | २१ |
| १३ ओढ | ... | २२ |
| १४ चिंगी | ... | २३ |
| १५ बेकारांचा तांडा | ... | २५ |
| १६ मी माझा शिल्पकार झालो | ... | २८ |
| १७ आव्हान | ... | २९ |
| १८ ध्यास | ... | ३० |
| १९ संगम | ... | ३१ |
| २० वय तुझें पोरी सोळा ग | ... | ३२ |
| २१ जखम | ... | ३३ |
| २२ खोटा पैसा | ... | ३४ |
| २३ काळीमाया | ... | ३५ |
| २४ माझा नागवा हा देह | ... | ३६ |
| २५ मीलन | ... | ३७ |
| २६ गर्जा जयजयकार वीरांचा | ... | ३८ |
| २७ वाटे अशा वेळीं– | ... | ४० |

पृष्ठ क्रमांक


| | | |
|---|---|---|
| २८ उल्का आणि झरा | ... | ४१ |
| २९ सहानुभूती | ... | ४२ |
| ३० जाणीव | ... | ४३ |
| ३१ शांतीदूत आम्ही | ... | ४४ |
| ३२ हवे मला लाख हात | ... | ४५ |
| ३३ अभागी | ... | ४६ |
| ३४ मन माझे वाऱ्यावर | ... | ४७ |
| ३५ ये येशिल तर | ... | ४८ |
| ३६ एकटा | ... | ४९ |
| ३७ आम्ही पुत्र सागराचे | ... | ५० |
| ३८ आक्रोश | ... | ५१ |
| ३९ आई | ... | ५२ |
| ४० गाडीवान दादा | ... | ५३ |
| ४१ देव्हारा | ... | ५५ |
| ४२ पाय फुटले डोळ्यांना | ... | ५६ |
| ४३ हिरवी पाती | ... | ५७ |
| ४४ कुंजवनी वाजते बांसरी | ... | ५८ |
| ४५ मैलाचा दगड | ... | ५९ |
| ४६ मीरा नाचे मंदीरांत | ... | ६० |
| ४७ जनी एकली दळते | ... | ६१ |
| ४८ माड खुळा | ... | ६२ |
| ४९ पदर | ... | ६३ |
| ५० कवडसा | ... | ६४ |
| ५१ अमरात्म्यानों | ... | ६५ |
| ५२ सीमेवर | ... | ६६ |
| ५३ जीवन | ... | ६७ |
| ५४ दुपार | ... | ६८ |
| ५५ पृथ्वी निघाली थाटांत | ... | ६९ |

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम ३३६५५० वि: ३५५
क्रमांक ९५५८ नों दि
मराठा ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९२८६०
(स्थळ प्रत)

## १ : द्राक्षवेल

वळणाच्या वाटेवर
उभी एक द्राक्षवेल
येणाऱ्यांच्या, जाणाऱ्यांच्या
उरीं उडे घालमेल ॥ १ ॥

थेंब-दंवांनीं भिजली
तिची पोपटी पैठणी
पदराच्या पल्याडची
झालीं उघडीं ऊरवाणीं ॥ २ ॥

तिच्या उघड्या पोटऱ्या
चोळी दंडांत रुतली
मिटलेला डावा डोळा
खूण जगाला पटली ॥ ३ ॥

साधाभोळा ताडमाड
तोही रुपाला भाळला
पारावरचा पिंपळ
पार सोडुनि ढळला ॥ ४ ॥

शीळ घालीत वाऱ्यानें
केली तिच्याशीं लगट

दोन घोंस थरारले
पडे बाहूंची चौकट ॥ ५ ॥

वाटेतील वाटसऱ्या
थांबु नको, चाल वाट
अशा उघड्या रानींची
द्राक्षें असतीं आंबट ॥ ६ ॥

■ ■

## २ : सुदामा

सुदाम्याच्या पुण्याईची
उरीं बांधुनि शिदोरी
झोळी लावुन काखेला
फिरतो मी दारोंदारीं ॥ १ ॥

आठवते बालपणीं
वाचलेली एक कथा
होती कळली कृष्णाला
माझ्या सुदाम्याची व्यथा ॥ २ ॥

हाच आशेचा–किरण
कधीं मनांत फुलतो
आणि पोह्यांची मोटली
घट्ट उराशीं धरितो ! ॥ ३ ॥

■ ■

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ... वि: ...
क्रमांक ... दि. ...

# ३ : वीर कथा महाराष्ट्राची

या बाळानों, तुम्हां सांगतो वीर कथा महाराष्ट्राची
ह्या भूमीच्या कणाकणावर खूण असे शिवरायाची
जय बोला महाराष्ट्र, जय बोला महाराष्ट्र ॥ धृ ॥

शिवनेरीवर सूर्य उगवला परदास्याच्या रात्रींमधें
स्वातंत्र्याचे किरण दौडले क्षणार्धांत दशदिशामधें
चेतवणारी ठिणगी पडली धगधगणाऱ्या मनांमधें
ज्वाला भिडतां ह्या अग्नीच्या वाताहात हो शत्रूंची
ह्या भूमीच्या कणाकणावर खूण अस शिवरायाची
जय बोला महाराष्ट्र, जय बोला महाराष्ट्र ॥ १ ॥

आयुष्याचा दोरा बांधला सिंहगडी तानाजींनें
देहाचा उंबरठा केला पावनखिंडी बाजींनें
शिरावेगळें धड लढविलें निर्भय मुरारबाजीनें
रक्ताच्या बिंदूतून होती ईर्षा केवळ त्यागाची
ह्या भूमीच्या कणाकणावर खूण असे शिवरायाची
जय बोला महाराष्ट्र, जय बोला महाराष्ट्र ॥ २ ॥

धर्मासाठीं मृत्युच्या वेदीवर चढला संभाजी
अंगावर फटके बसले पण मुका राहिला खंडोजी
शत्रूंनाही पुरुन उरले धनाजी आणि संताजी
कबर इथें बांधली मातीनें अखेर औरंगजेबाची
ह्या भूमीच्या कणाकणावर खूण असे शिवरायाची
जय बोला महाराष्ट्र, जय बोला महाराष्ट्र ॥ ३ ॥

दख्खनच्या सनदा मिळविल्या विश्वनाथ बाळाजीनें
वसईचा किल्ला लढविला शूर चिमाजी अप्पानें
भगवा झेंडा अटकेवरती फडकविला राघोबानें
शत्रूंना जिंकून राहिली विजयपताका शौर्याची
ह्या भूमीच्या कणाकणावर खूण असे शिवरायाची
जय बोला महाराष्ट्र, जय बोला महाराष्ट्र ॥ ४ ॥

अबदालीनें स्वारी केली, दिल्लीला वेढा दिधला
'बचजाअें तो और लढेंगे' दत्ताजी खाली पडला
मर्द मराठा त्यावेळेला साऱ्या शक्तीनी लढला
पानीपतावर ज्योत विझाली अखेरची स्वातंत्र्याची
ह्या भूमीच्या कणाकणावर खूण असे शिवरायाची
जय बोला महाराष्ट्र, जय बोला महाराष्ट्र ॥ ५ ॥

अन्यायानें चेतविली ही ज्योत पुन्हां मुंबापुरीला
मर्द मराठा रस्तोरस्ती निधड्या छातीनें लढला
चौपाटीच्या रेतीचा कण रक्तानें पूनित झाला
चौथऱ्यावरी स्मृती कोरली उज्वलशा भवितव्याची
ह्या भूमीच्या कणाकणावर खूण असे शिवरायाची
जय बोला महाराष्ट्र, जय बोला महाराष्ट्र, ॥ ६ ॥

घोड्यावरती खोगीर घालून उभा शिवाजी वेशीशीं
सह्याद्रीची ढाल बांधली सदैव त्यानें पाठीशीं
लखलखती तलवार सांगते गर्जून साऱ्या दुनियेशीं
खबरदार जर लुटाल पुन्हां आठव ठेवा काळाची
ह्या भूमिच्या कणाकणावर खूण असे शिवरायाची
जय बोला महाराष्ट्र, जय बोला महाराष्ट्र, ॥ ७ ॥ ■ ■

## ४ : माती मराठी मोलाची

माझ्या झांकल्या मुठींत
चीज लाख रे मोलाची
हिच्या रक्षणाकरितां
बाजी लावीन जीवाची ॥१॥
नको लावुन परीस
हिची करुं तूं पारख
औरंगजेबाची कबर
तुला सांगेल ओळख ॥२॥
सह्याद्रीच्या छातीवर
हिच्या पावलांची खूण
चौपाटीच्या रेतीवर
हिच्या रक्ताचें सिंचन ॥३॥
हिचें इमान जागतें
हिचा जागता दरारा
गत कालाच्या स्मृतीनें
दिल्ली कांपे थरथरा ॥४॥
माझ्या झांकल्या मुठींत
माती मराठी मोलाची
हिच्या रक्षणाकरितां
बाजी लावीन जीवाची ॥५॥ ■ ■

## ५ : माझा फाटलेला गळा

अंधुकलें जग सारें
बाळा कर आतां गाई
हातीं पाळण्याची दोरी
आई आळवी अंगाई ॥१॥
कुठें रंगली बैठक
रातसुद्धां थबकली
ओठां अमृताचा प्याला
स्वर्ग उतरला खालीं ॥२॥
थाप पडे डफावर
जाग येई सह्याद्रीला
शाहिराची रसवंती
सांगे ओळख रक्ताला ॥३॥
ढोलकीच्या लयीमध्यें
कुठें वाकतें शरिर
तान ह्रदयाला वेढी
लोळे पायाशीं कुबेर ॥४॥
माझा फाटलेला गळा
गल्लीं गल्लींत घुमतो
वितभर ह्या पोटाची
आणि आग शमवीतो ॥५॥

## ६ : पांचा पांडवांची मूठ

माझ्या हाताचीं हीं बोटें
जणुं पांच हे पांडव
माझ्या सुखी जीवनाचा
त्यांनीं रचिला मांडव ॥१॥
रेशमाच्या गादीवर
जीव त्यांचें सुखावले
रानावनांत फिरतां
कांटे पायांत मोडले ॥२॥
सोनियाच्या ताटांतील
गोडी आहे चाखलेली
कंदमुळें पाण्यावर
भूक अर्धी जाळलेली ॥३॥
आहे सारे साहलेलें
याची डोळा पाहिलेलें
म्हणूनीच मार्गावर
नीट पडती पाऊलें ॥४॥
एक जरी दुखावला
चार भिजतात डोळे
एक जरी सुखावला
चार बांधीती हिंदोळे ॥५॥

पांचा पांडवांची मूठ
घाव घणाचा घालिते
संकटांच्या माथ्यावर
माझें भविष्य लिहिते ॥६॥

■ ■

## ७ : दान

माझी आंधळ्याची भक्ति
पंढरीत रुजू झाली
पाठी घोंगडी टाकून
विठू माऊली धांवली ॥१॥
काय मागूं हत्ती घोडे
जोडूं कुबेराशीं नातें
मोल कष्टांचे कळण्या
देरे जनीचे तें जातें ॥२॥
दीड-वितीचे हें पोट
अर्धे अधीक भरूं दे
उरलेल्या अर्ध्यासाठीं
चिंता उद्यांची जाळूं दे ॥३॥
एक डोळा जग पाहो
दुजा मेलेला राहुं दे
उणीवेच्या जाणीवेनें—
तुझा आठव होऊं दे ॥४॥

■ ■

# ८ : कांठ ओलावे परंतु

खडा फेंकुनि तळ्यांत
खोड पाण्याची काढावी
लाट बिलगता कांठा
त्यांत छबी न्याहाळावी ॥१॥

आज कधीं कधीं येतो
जुन्या स्मृतीनां उजाळा
तुझ्या निळ्या डोळ्यांतील
तळें खुणावतें मला ॥२॥

ओठ जुळता ओठांशीं
गालीं डाळींब फुटतें
पापणींच्या कांठापाशीं
रुप आगळें हालतें ॥३॥

बालपणींचा हा खेळ
आज रक्तांत भिनला
कांठ ओलावे परंतू
जाच पाण्याला घडला ॥४॥

■ ■

## ९ : आवडला देवाला तूं रे

(महाराष्ट्राचे आवडते किर्तनकार कै. ह. भ. प. दासबुवा परुळेकर यांच्या आत्म्यास वंदन करून.)

आवडला देवाला, तूं रे आवडला देवाला
पुष्पक विमान घेऊनि दारीं दूत यमाचा आला ॥ धृ ॥

संसाराच्या पदीं शृंखला
'तुका' परी किर्तनीं रंगला
जनसागर भोंवतीं उसळला
स्वतःचेंच गुणगान ऐकतां देव स्वतः विरघळला
आवडला देवाला, तूं रे आवडला देवाला ॥ १ ॥

देह तुझा घर भगवंताचें
श्वासोछ्वास ध्वनी चिपळ्यांचें
जप करिती ठोके हृदयाचे
देव्हाऱ्यांतिल आयुष्याचा नंदादीप विझाला
आवडला देवाला, तूं रे आवडला देवाला ॥ २ ॥

स्थल, कालाचे तुला न बंधन
पैशानें तूं सदा अकींचन
जीव ओतुनी केलें किर्तन
देव दाविण्या शिडी लाविली देहाची स्वर्गाला
आवडला देवाला, तूं रे आवडला देवाला ॥ ३ ॥

मंदिरांतुनी कीर्तन चाले
तुझ्या स्मृतींचे मनास झोले
पाणवती श्रोत्यांचे डोळे
देवसुद्धां ऐकाया आतुर ओळखीच्या शद्बाला
आवडला देवाला, तूं रे आवडला देवाला ॥ ४ ॥

शद्ब तुझा घुमतो गाभारीं
रुप कोरिलें तसे अंतरीं
नांव विटेवरी तुझें पंढरीं
पायरिचा पाषाणहि जपतो पुनित तुझ्या स्पर्शाला
आवडला देवाला, तूं रे आवडला देवाला ॥ ५ ॥

■ ■

## १० : घागर

गळ्यांत पडतो पाश मृत्युचा
सरणावरती चढते जीवन
'सावित्री' जिंकिते 'यमाला'
घेऊन येते वर संजीवन ॥ १ ॥

ज्या हातांनीं गळा दाबला
ज्या हातांचे ऋण खांद्यावर
जीवन झिजते सेवेसाठीं
मरण पाहते वाट विटेवर ॥ २ ॥

■ ■

## ११ : जीवन माझें

रंगभूमीचा खलनायक मी
जीवन मजला कळलें आहें
सुखदु:खाचें गोड कडू फळ
मीच उगाळुनी प्यालों आहे ॥१॥

खिशांत माझ्या पैसा नाहीं
बुटांस पॉलिश माझ्या चकचक
मला नको पण हवा दिसाया
त्यांत जगाचा मुखडा झकपक ॥२॥

परिस्थितीनें विणलें जाळें
आणि मुखवटा जरीं बदलला
मी करितो कपड्यांना इस्त्री
तिथें जगाचा खिळला डोळा ॥३॥

अपुऱ्या आशा आकांक्षांची
मनांत जळते चिता सदाची
दिवस आजचा जातो वाया
मन रेखाटें चित्रं उद्यांचीं ॥४॥

मन माझें तळ संथ जलाचा
वरुनी झकपक निळा गालिचा
खडा टाकिता दिसे परंतु
रंग मुखावर खरा, मनाचा ॥५॥

मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणे
दा. क्र. ३२७६०
मंबई शाखा (स्थळ प्रत)

चर्नीरोड ते मरीन-लाईन
जीवन माझें स्मशान-भींत
पल्याड कांहीं घडतें आहे
मुखावरी ना खेद न खंत ॥६॥

■ ■

## १२ : लाट दूर दूर फुटे

तुझा सावळा ग रंग
काळा तीळ गालांवर
हंसतांना वाटे जणुं
नाव हले पाण्यावर ॥१॥
नऊ वारी लुगड्यांत
तट्ट फुगलें यौवन
चुलीवर तापलेलें
दूध जातसे ऊतुन ॥२॥
चोळी खणांची पोटीमा
गांठ तिची पाठीवर
मान मोडुनि पडले
दोन ससे छातीवर ॥३॥
तुझ्या डोळ्यांत मासोळी
माझा कोरडाच गळ
लाट दूर दूर फुटे
कांठ झाला उतावीळ ॥४॥

■ ■

## १३ : ओठ

तुझ्या ओठांत लपले
देवाघरचें अमृत
ओठांवरि ओठ नेतां
कळे गोडी रे अवीट ॥ १ ॥

तुझ्या झांकल्या मुठींत
आहें कुबेराचें धन
माझ्या भावी आयुष्याचें
सुख आणि समाधान ॥ २ ॥

निळ्या डोळ्यांची ठेवण
गुज मागचें सांगते
आणि जखम उरींची
पुन्हां सतेज बनतें ॥ ३ ॥

फुटलेल्या आरशाच्या–
मन भिंगास जुळवी
रूप पाहतां ‘ विद्रूप ’
आसूं पापणी भिजवी ॥ ४ ॥

तुझ्या रूपांत मी वाची
गत जीवनाची कथा
गोड मिठींत विसरे
खोल उरींची मी व्यथा ॥ ५ ॥

माझें जीवन कसले ?
मी हो तुटलेली वेल
जगविण्यास झटतें
वेलिवरलें हें फूल ॥६॥

■ ■

## १४ : चिंगी

(कविवर्य विंदा करंदीकर यांची क्षमा मागून)

चिंगी होती रामासोबत
मर्यादेंतील एक सुंदरी
चिंगी उरली रामानंतर
भिरभिरणारी जणूं भिंगरी
या चिंगीशीं जपून बोला
पोरांपासून थोरांच्याही
हृदयांवरती बसेल टोला
चिंगी आहे बडबडणारी
गोड बोलुनी चिथावणारी
चिंगी आहे जहरी नागीण
स्त्री हृदयांवर सळसळणारी
या चिंगीला लज्जा नाहीं
लज्जेचेंही झालें चिलखत
वाग्बाणांचें झेलुनी हल्ले

मानही बनलें आहे बेडर
चिंगी आहे घरांघरांवर—लाल निशाणी
चिंगी आहे सौभाग्याला— भेगही तिरपी
चिंगी आहे घरांघरांतुन
चुलीजवळचें सारें निरखुन
चिंगी आहे गच्चीवरती
रस्त्यावरचें सारें निरखुन
चिंगी आहे पाठीवरती— चाळकऱ्यांच्या
चिंगी आहे अन् ओंठांवर— शाळकऱ्यांच्या
चाळ धन्याच्या बंगलीमध्यें
बाजेवरती चिंगी आहे
कामकऱ्यांच्या वाटेवरती
पदर तिचा ओघळतो आहे
नजर बुभुक्षित फिरते जेथें
तिथें तिथें ही चिंगी आहे
आज उद्यांचीं तरणीं पोरें
ह्या चिंगीची पुंजी आहे
काळोखाचा काळा बुरखा
लपेटुन जग जेव्हां निजतें
चिंगी तेव्हां ‘ चिंगी ’ नसतें
जुन्या स्मृतींच्या समईमध्यें
वात होऊनी सतेज जळते

■ ■

## १५ : बेकारांचा तांडा

[ कविवर्य श्री. वि. म. कुळकर्णी यांची क्षमा मागून. कारण त्यांनीं साकार केलेला ‘ लमाणांचा तांडा ’ पाहून मला ही कविता स्फुरली आहे. ]

—चालला चालला बेकारांचा तांडा
एका ठिकाणाहून दुजा ठिकाणाला
रचिले कित्येक मनांत मनोरे, त्यावरि दिलेले आशांचे गिलावे
सुरुंग लागता तयांना धडाडा, जमिनिसपाट झालेहि सगळे
सारें मृगजळ !
आतां दुजा तळ ! !
चला गांठूं चला ! ! !
चालतां चालतां फुलवुं परत—
मेलेल्या मनांत नवीन फुलोरे ! !
—चालला चालला बेकारांचा तांडा
डोईवर यांच्या आशांचें गांठोडें
चालून चालून थकलेले पाय, थकलेलें मन...
कांखेला लावीली लहान पिशवी
‘सर्टिफिकेटें’ मिळालीं जेवढीं तेवढीं तिच्यांत घातलीं जपून
‘ प्रशस्तिपत्रकें ’ ( लावण्या वशीला ) घेतलीं संगती
लिहावया पेन, अर्जाचा नमुना
परत परत आठवून सारें, घातलें खिशांत

[ असेल तेथें इराणी हॉटेल !
मिळेल खावया चहा नि मिसळ ! !
म्हणूनि शिदोरी घेतलेली नाहीं ]
रस्याच्या कडेनें, छप्पराखालुन
धडधडणाऱ्या यंत्राच्या वेगानें अपुल्या छातीवर-
अपुल्या हातांचें ठेऊनी वजन
आठवीत सारे अपुले पूर्वज
मनोभावे त्यांचा उद्धार करीत
शतशः त्यांना प्रणाम करीत
घोळवीत मुखीं रामनाम जप
—चालला चालला बेकारांचा तांडा
निरखुनी पहा तांड्यांतील तुम्हीं बेकार बापये !
तुमचेच भाई, सगे नी सोयरे
लाचार चेहऱ्यावरती दिसेल
काळजीनें दाट विणलेलें जाळें
[ सोसतां घणाचे घावावरि घाव
येईल अंगांत कधीं देवपण
हाच एकमेव.... .......
बुडत्या माणसा काडीचा आधार. ]
विझते निखारे धरून उराशीं ऊबेच्या आशेनें
—चालला चालला बेकारांचा तांडा
आणि तांड्यांतिल पाहिलांत कां तो बेकार तरुण ?

नवीन कपडे अंगांत घालून
जणूं हा नवरा नटला आहे
त्याच्या पाठीवर ज्ञानाचें गांठोडें
डोईवरी आणि जडजड सारें संसाराचें ओझें
कां बरें थांबला ?—समजले सारें !
पुढें ऊभी आहे एक भिकारीण हात पसरून
अंगावरी तिच्या फाटकीं लक्तरें
मागुनि धांवतीं पदर धराया दोनतीन पोरें
कटिखांद्यावरी तान्हुलें बालक लोंबतें स्तनांशीं
दुधाच्या आशेनें चोखीत चामडी
हेलावलें मन पाहुनि ती दैना
छोटेसें पाकीट काढलें बाहेर
चारच आणेल्या होत्या त्यांत सुट्या—
येतांना घेतल्या कांहींतरी दोन-प्रहरी खाण्यास
हळूंच ठेविल्या त्यांतील दोन तिच्या हातांवर
समाधानपणें हंसली ती बाई
वदली पोरांस 'करा नमस्कार बड्या साहेबांना'
'बडा साहेब मी ?' हंसला बेकार मोठ्या खिन्नतेनें
मिसळून गेला पुन्हां सवंगड्यांत
—चालला चालला बेकारांचा तांडा
एकाठिकाणाहून दुजा ठिकाणाला.

■ ■ ■

## १६ : मी माझा शिल्पकार झालों

रुपयाचा आकार बदलला
आणि उसवली शिवण खिशाची
त्याच क्षणाला कळुनी चुकलें
सोबत आतां नसे कुणाची ॥१॥

शब्द विसरले जात आपुली
दिले मला ज्यानीं आश्वासन
रक्ताचाहि रंग बदलला
उरलें केवळ तोंडपुजेपण ॥२॥

प्रसाद कुठला नसे दक्षिणा
उणे दाखवी नजर बुवाची
पायरीचा पाषाणहि द्रवला
वाट बंद परि गाभाऱ्याची ॥३॥

मनीं रात रडते अवसेची
ओंजळींत गाळींत आंसवें
आंसू पिउनी हंसति परंतू
झाडांवरचे क्षुद्र काजवे ॥४॥

मी माझा शिल्पकार झालों
घाव घणाचा पडे शिळेवर
फुले रात वरती पुनवेची
दैवत माझें हंसे विटेवर ॥५॥

## १७ : आव्हान

आज तुला आव्हान.
विधात्या, आज तुला आव्हान ॥ धृ ॥

मातीचा कण उभा मातीवर
पाय धुतो बघ त्याचे सागर
सेवा ही चालली निरंतर

अगास्थिचा अभिमान वाहतो—
ताठ ठेऊनि मान ॥ १ ॥

बर्फांच्या आरसेमहालीं
रुप स्वत:चें कुणि न्याहाळी
अजिंक्यतेचा शिक्का भाळीं

छाताडावर पडलें पाऊल
मस्तक झालें छिन्न ॥ २ ॥

बर्फांचे पांघरुन शेले
दूर कुणी रागावुनि बसले
अश्रू तयांचे जाउनि पुसले

दक्षिण उत्तर ध्रुवावरती–
फडके आज निशाण ॥ ३ ॥

हिमालयाची रवी करोनी
पॅसिफिक टाकूं घुसळोनी
रत्नांचें वर काढूं लोणी

भारतांतही जन्मा येतिल–
शेफर्ड, गागारिन ॥ ४ ॥ ■■

## १८ : ध्यास

काल होतास तूं कळी
फुला आज फुललास
आणि उद्यांच्या जगाचा
ध्यास मनीं घेतलास ॥ १ ॥

मेंदी भरल्या नखांचे
कुठे वाजतां पाऊल
पानांआडुन भीतीनें
हळूं घेतली चाहुल ॥ २ ॥

गाभाऱ्यांतील घंटेचा
नाद येई तुझ्या कानीं
दगडाला पूजण्याची
चीड डोकावते मनीं ॥३॥

कुठे गेलेल्यांचा शोक
तुझें हृदय विदारी
प्रेतें सजविण्यासाठीं
तुझ्या मानेवर सुरी ॥ ४ ॥

भावी, भाविक, भटजी
'इश्यगडे,' 'प्राणनाथ'
तुला खुडण्याकरीतां
पुढे आले दहा हात ॥ ५ ॥

काल होतास तूं कळी
फुला आज फुललास
आणि उद्यांच्या जगाचा
ध्यास मनीं घेतलास ॥ ६ ॥

## १९ : संगम

दोन तीर दूर दूर
संथ वाहे निळें पाणी
त्यांना सांधुनी राहिल्या
ऊंच पोलादी कमानी ॥ १ ॥
ऊंच पोलादी कमानी
नाहीं कधीं भंगणार
जल मायेचा ओलावा
नाहीं कधीं आटणार ॥ २ ॥
नाहीं कधीं आटणार
तुझें आणि माझें प्रेम
आहे विरह साहण्या
आठवणींचा संगम ॥ ३ ॥
आठवणींचा संगम
चित्र तुझें रेखाटिल
दूर गेलास तरी तूं
रोज मला भेटशील ॥ ४ ॥

## २० : वय तूझें पोरी सोळा ग

नकोस दडवूं पदराखालीं
वय तुझें पोरी सोळा ग
छातीवरती तुझ्या बांधला
मदनाचा झुलता झोला ग ॥ १ ॥

कर्णफुलांतील विलोल लोलक
तेज फांकलें मुखचंद्रावर
गालांवरती लाज गुलाबी
जशी दाटली साय दुधावर ॥ २ ॥

ढग माथ्यावर विस्कटलेला
भाळावरती शुक्र–चांदणी
रात्रींच्या त्या जागरणानें
मिटूं पाहतें धुंद पापणी ॥ ३ ॥

ढगांतुनी कोंसळते बिजली
वेणींतुन ओघळतो गजरा
चुरगळलेल्या वस्त्रांमधुनी
तुझ्याच फिरती कामुक नजरा ॥ ४ ॥

बांधलीस कां पाठीवरती
चोळीची सुरगांठ पोरी तूं
नकोस सांगू ओळखला मी
स्वप्नाळू डोळ्यांतील हेतू ॥ ५ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ३३६५० वि: ३/७१
क्रमांक २५३३५ नों दि: २५/१/७२

रसरसणारें तव हें यौवन
घट भरला जणुं कांठोकांठ
दो हातांनीं घट्ट धरावा
रिता करावा लाउनि ओठ ॥ ६ ॥

■ ■

## २१ : जखम

झुलत्या दगडी रुंद पुलावर
रात एकली बसली जागत
अनामिकाच्या पदचिन्हांची
मुक्या दिशांना वाट विचारित ॥ १

एकांतावर देती गिलावा
रातकिड्यांची बेसुर गाणीं
संथ जलाच्या अल्लड लाटा
पायाशीं घालीती उखाणीं ॥ २

रंग वितळतो आकाशाचा
जडावते पापणी भुकेली
आणि दलांच्या तळहातांवर
केवळ उरते जखमच ओली ॥ ३

■ ■

## २२ : खोटा पैसा

खोटा पैसा, खोटा पैसा
अंगावरती पडल्या लाथा
वळ पाठीवर अन्यायाचे
रक्तानें रंगविला माथा ॥१॥

जन्मतांच तो वांझेपोटीं
लोक म्हणाले हा वांझोटा
आई त्याची वेश्या म्हणुनी
जगांत तोहि ठरला खोटा ॥२॥

इतरांपाशीं जें जें आहे
तें तें सारें त्याच्या गाठीं
केवळ नाहीं कुणी मारिला
माणुसकीचा शिक्का माथीं ॥३॥

कितीक ऐसे खोटे पैसे
रस्त्यावरती जगती जीवन
देह आपुला विकून रात्रीं
उद्याचें करताती पूजन ॥४॥

खून स्वतःचा स्वतःच प्याले
ओठांवरती चीड भयंकर
सूड उगवती ते रात्रीला
दिवसाच्या ढवळ्या विश्वावर ॥५॥

कुणी निर्मिला खोटा पैसा
आम्हींच त्यांचे आई बाप
त्या दुबळ्या असहाय जिवांचे
माथ्यावरती अमुच्या पाप ॥६॥

## २३ : काळी माया

( कविवर्य श्री. बा. भ. बोरकर यांची क्षमा मागून )

काळे तुझे केस काळ्या डोळ्यांवरि आले
काळा मेघ, काळे पाणी हितगुज चाले
वर काळी–निळी माया, खालीं काळी माती
काळोखाला भिडे तुझी काळी धीट छाती

काळा काळा कोट तुझा, काळा काळा सूट
काळी ' नेकटाय ' गळा, पायीं काळे बूट
सभोवतीं तुझ्या काळ्या सवंगड्यांचे जाळे
काळोखाला भय वाटे असे तुझे चाळे

काळोखाचे काळे विष चढे तुझ्या अंगीं
काळ्या नजरेची काळी तलवार नंगी
काळोखांत काळ्या वाटा ओळखीच्या साऱ्या
नसे जना ठाव त्याचा कधी करी चोऱ्या

सिगारेट नको ओढुं, गोरी तिची काया
ओळखील तुला कोणी सोड तिची माया

## २४ : माझा नागवा हा देह....

माझ्या उंची कपड्यांना
ज्यानीं सलाम ठोकला
आज फाटका पाहुन
त्यांनीं चेहरा झांकला ॥ १ ॥

साखरनें भरलेली
मूठ माझी रिती झाली
अंगावर फिरणारी
मुंगी चावरी बनली ॥ २ ॥

सारीं गळालीं लक्तरें
रान वाढलें केसांचें
एक उरली लंगोटी
तेंच साधन लज्जेचें ॥ ३ ॥

हातीं घेऊन दगड
पोरें पाठीस लागली
मारलेल्या दगडांना
माझी व्यथा समजली ॥ ४ ॥

दिली कासेची लंगोटी
वीज घेतली हातांत
राखेखाली पिचणारे
आलों निखारे फुंकित ॥ ५ ॥

माझा नागवा हा देह
आज पेटला, पेटला
आणि खोट्या प्रतिष्ठेला
मिठी मारीत सुटला ॥ ६ ॥

■■

## २५ : मीलन

अंधुकलें जग अंधारानें
अंधुकली क्षितिजाची रेषा
दोन तिरांवर दोन प्रवासी
आकळीत हृदयांची भाषा ॥ १ ॥
पैल तिरावर उभें निळें नभ
भिंगांची लेवुनी पैठणी
अधिकच आणि झुकलें खाली
ओष्ठ-द्वयांची करुनी जुळणी ॥ २ ॥
पैलतिरावर झुरतो सागर
हृदयीं घेउनि प्रीत आगळी
क्षणापुढिल त्या स्वर्गसुखाची
ज्या जीवाला ओढ लागली ॥ ३ ॥
विरघळली क्षितिजाची रेषा
रुढीचें जणुं तुटलें बंधन
सागर–वक्षा कळुनी चुकले
थरथरत्या अधरांचें कंपन ॥ ४ ॥ ■■

## २६ : गर्जा जयजयकार वीरांचा

[ गोव्याला स्वातंत्र्य मिळावं म्हणुन ज्यांनीं हौतात्म्य पत्करलं, ज्या क्रांतिकारकांनीं आंतुनच स्वातंत्र्याची ठिणगी चेतवली आणि शेवटीं ह्या सर्व आघातांनीं जर्जर झालेल्या पोर्तुगीज साम्राज्यशाहीवर ज्यानीं अखेरचा घाव घातला ते भारतीय सैनिक ह्या सर्वांचा जयजयकार.]

गर्जा जयजयकार वीरांचा, गर्जा जयजयकार
गुलाल उधळा, उधळा कुसुमें, गळ्यांत घाला हार ॥धृ॥

पेटविलें रणकुंड बांधवांनीं स्वातंत्र्याचें
घरांघरांतुन तप्त निखारे फुलले देहाचे
सुरुंग उडले, उडल्या तोफा, प्रचंड आवेश
परकीयांचे रसातळाला गेले अवशेष
साथ कराया त्या बंधूंची धांउनि गेलों पार
गर्जा जयजयकार वीरांचा, गर्जा जयजयकार ॥ १ ॥

सुवर्णाक्षरीं लिहिली जाईल सतराची रात्र
रणगाड्यांच्या गर्जनेंत आम्हीं घुसलों गोव्यांत
दास्यशृंखला हातांमधल्या खळाखळा तुटल्या
गळ्यांत पडतां बंधू, बाह्या अश्रूनीं भिजल्या
स्वातंत्र्याचें पूर्ण जाहलें स्वप्न आज साकार
गर्जा जयजयकार वीरांचा, गर्जा जयजयकार ॥ २ ॥

चौदा वर्षें कसा सोसला रामानें वनवास
नसेल रुचला कौसल्येला स्वातंत्र्याचा घास

बांधियला मग पूल अखेरी आम्हीं सैन्याचा
आणि मारिला महापातकी रावण लंकेचा
विटां विटांवर अतां येथल्या असुचा हो अधिकार
गर्जा जयजयकार वीरांचा, गर्जा जयजयकार ॥ ३ ॥

हिरवे गुरुजी किती हुतात्मे झाले गोव्यांत
माणुसकीचा खून पाडला उडला आकांत
आम्हीं राखली नीति ठेवली अब्रुची चाड
क्रूरपणाचा कळस जाहला ठरलों आम्हीं भ्याड
तिसरा डोळा फुटला माथीं, ओतियला अंगार
गर्जा जयजयकार वीरांचा, गर्जा जयजयकार ॥ ४ ॥

रक्त सांडतां ह्या भूमीवर एका कोळ्याचें
घडे अखेरीं पुरते भरले त्यांच्या पापाचे
कवचकुंडलें अंगावरती धर्मानें घेतां
श्रीकृष्णानें अर्जुनास मग सांगितली गीता
महाभारतीं पुन्हां जाहला दुष्टांचा संहार
गर्जा जयजयकार वीरांचा, गर्जा जयजयकार ॥ ५ ॥

असुचें जें तें आम्हीं घेतलें तुम्ही कोण पुसणार ?
असुच्या देशीं चोर-पाऊलीं तुम्हीं कोण घुसणार ?
आठव असुं द्या ह्या पर्वाची, नका पाहूं अंत
हिमालयाची येऊं आम्हीं ओलांडुनि भींत
बाहुबलाचा आज जाहला आम्हांस साक्षात्कार
गर्जा जयजयकार वीरांचा, गर्जा जयजयकार ॥ ६ ॥

## २७ : वाटे अशा वेळीं

सागराच्या वक्षावर
स्तन नभाचा टेकला
झाडांवर काजव्यांनीं
डोळा हळूंच घातला ॥ १ ॥
आडोशाला रातराणी
मस्त सुगंधानें न्हाली
रातकिड्यांची बत्तीशी
कांहीं अभद्र बोलली ॥ २ ॥
दूर दोन हातांवर
भूकें यौवन झोंपलें
बाजेवर देह माझा
जणुं निखारे पेटले ॥ ३ ॥
झोपलेला गोतावळा
बेडी पडली पायांस
भिंत रुढीची लंघुन
आले तुझेमाझे श्वास ॥ ४ ॥
वाटे अशा वेळीं व्हावें
मोरपीस काळोखाचें
तुलामला फुटावेत
चार डोळे मांजरीचे ॥ ५ ॥

## २८ : उल्का आणि झरा

देवेंद्राच्या दरबारीं
डाग लागला प्रितीला
न्याय देवता आंधळी
पायीं रुढीच्या शृंखला ॥१॥

दोन जीवांची जीवंत
तीनें उधळलि प्रीत
शापभ्रष्ट झाली उल्का
केला तिचा कडेलोट ॥२॥

कोसळतां, कोसळतां
धिक्कारत आली नभा
तिला झेलण्याकरितां
प्रियकर होता ऊभा ॥३॥

पाय सोडुनि जलांत
उल्का बसली काठांशीं
वाहे मोत्यांची ओंजळ
झरा तिच्या पायापाशीं ॥४॥

आतां वाहत्या झऱ्याची
चाल येथें मंदावते
दोन रेशमी करांची
मिठी येथें रुंदावते ॥५॥ ■■

## २९ : सहानुभूति

दीन भिकारी पसरुनि बसला
रस्त्यावरती मळकें लक्तर
गोड गळ्यांतून गीत गात अन्
साथ देत पेटीची सुंदर ॥ १ ॥
विसावलीं क्षण तिथे पाऊलें
रावरंक अन् कितीक पोरें
क्षणभर हललीं अंतःकरणें
क्षणभर दुःखी झाले सारे ॥ २ ॥
तान संपली, गान संपलें
श्वास मिळाले वातावरणीं
जमलेल्या श्रोत्यांची कुजबुज
त्या अंधाच्या आली कानीं ॥ ३ ॥
हर्ष दाटला मनीं, म्हणतसे
दैव असे मज आज अनुकूल
सकाळपासून बसलो येथें
श्रम न आजला वांया जातिल ॥ ४ ॥
हळू फिरविला हात तयानें
पैसे घेण्या फडक्यांवरचे
हाय, परंतु काय मिळाले
खडे बोंचले रस्त्यावरचे ॥ ५ ॥

## ३० : जाणीव

निळी नितळ वर कांच बिलोरी
रजताचा रिमझिमता पाऊस
संथ निळ्या लाटांत कालवे
रजनीचें तें हास्य निरागस ॥१॥
दूर कमान ऊभी पूलाची
एकांतावर कोरित अंतर
शांत, स्तब्ध वस्त्रावर विणल्या
हळूंच घाली वारा फूंकर ॥२॥
नदिकांठावर विसांवलेल्या
माडांचे संपलें भावगित
निजल्या होड्या पीत चांदणें
दर्यावरची लुटून दौलत ॥३॥
दूर एकल्या झोंपडींत त्या
मिणमिण जगते जीवन ज्योती
कुणी बैसला उजेडांत त्या
बांधित इमले स्वप्नांवरती ॥४॥
असा धुंद एकांत हवासा
हवीस तूही जवळी वाटे
परी नभाला भिडता दृष्टी
विरहाचें तम मनांत दाटे ॥५॥

## ३१ : शांतीदूत आम्हीं

स्वतंत्र भारत मातृभूमीचे–
शांतीदूत आम्हीं ॥ धृ ॥
येथें ना झडतीं रणवाद्यें
गर्जगर्जतीं ना शस्त्रास्त्रें
आम्हीं ना पूजक हिंसेचे
शिंग फुंकुनि देऊं जगाला–
हीच एक ग्वाही
शांतीदूत आम्ही ॥ १ ॥
पुढें चालला वीर जवाहर
मागुनी उसळे जनतासागर
शांतीचे गीत गात निरंतर
लहरीं लहरींतुन समिराच्या–
नाद भरुनि राही
शांतीदूत आम्हीं ॥ २ ॥
परतंत्र्याचें बंद तोडणें
मानवतेला स्वतंत्र करणें
विश्वबंधुप्रेमानें जगणें
हीच मनांतिल आंस आमुच्या–
कृतींत भरुनि राही
शांतीदूत आम्हीं ॥ ३ ॥

हिमालयाचें गौरीशंकर
शांतीचें तें पवित्र मंदिर
दूर निनादे घंटेचा स्वर

जगास सांगे मदतीसाठीं–
साद घालुनि पाही
शांतीदूत आम्हीं ॥ ४ ॥

## ३२ : हवे मला लाख हात

श्रावणाच्या सरीसम
अश्रु मला तूं दिलेस
हात पडती अपुरे
बांध त्यांना घालायास ॥ १ ॥
जग आलें उंबऱ्याशीं
मला सांगायास व्यथा
आहे अश्रुंत बुडली
माझ्या जीवनाची गाथा ॥ २ ॥
माझे अश्रु मला हवे
पण हवे लाख हात
अश्रु दुजांचे पुशीन
स्वतः राहुन दुःखांत ॥ ३ ॥

## ३३ : अभागी

पंख असुनी उडुं न शकते एक पाखरूं
निळ्या नभाचे घेऊनी ओझे पंखावरती
हलत्या पिंपळ पारंबीवर त्याचें घरटें—
हलते अस्थिर—
घरांत आहे भावंडाचे भरले गोकुळ
शाल पांघरुन मातेच्या मायेची
नाहीं पिता—
हेंच उणेपण मना पोखरी
हृदयावरची जखमही ओली
सदासदाची पाझरणारी थेंबे थेंबे
परी तयांचे लक्ष न तिकडे
एका हातें आसूं पुसुनी—
दुज्या कराने सारी झटती—
हलतें घरटे सावरण्यास्तव फांदीवरचे
दूर कुठेतरी उडुनी जाती—
सारी सारी भल्या पहाटे
हृदयीं बांधुन आकांक्षाचा जळता मोहोर
तेंच एकलें, तेंच एकलें
मनास दुःखे सांगुन रडते
दुर्भाग्याला दोषही देते आपण अपुल्या

उंबरठ्यावर उभे
पंखांचीही फडफड करिते उडण्यास्तव
आणि अखेरीं शिणुनी जाते
पंखामधुनि गळती पिसें
डोळ्यामधुनि झरती टिपें
उंबरठाही द्रवतो जाणुनी दुःख तयाचें
फिरते माघारें तदनंतर—
एक एकलें— ■ ■

## ३४ : मन माझें वाऱ्यावर

आयुष्याच्या प्रवाहाला
जन्म-मृत्युचा किनारा
वाळु सोनेरी क्षणांची
शंख शिंपाचा पिसारा ॥ १ ॥
आशा संसारी हातांनीं
घर मातींत बांधते
निराशेची वैरागीण
सारे लोटून टाकते ॥ २ ॥
आशा निराशेचा मेळ
कधीं खेळांत जमेना
मन माझें वाऱ्यावर
घर आकार घेईना ॥ ३ ॥ ■ ■

## ३५ : ये येशिल तर

ये येशिल तर नेसुन ये तूं
साडी हिरव्या तृणपात्यांची
जिला असावी किनार आखिव
लाल भडक पाऊल वाटेची ॥ १ ॥

कृष्ण घनाचें कर गंगावन
केसांचा संभार सजव तूं
अंबाड्याचा झुलता झोला
मानेवरती घाल परंतू ॥ २ ॥

माळ हवी तर अंबाड्यावर
ह्या बिजलीची रेखिव वेणी
खोंव हवे तर अंबाड्यांतुन
धुमकेतूचें फूलहि उलटें ॥ ३ ॥

मला वाटतें टपोर द्राक्षें
कर्णफुलें कानीं तीं खुलतिल
साज आगळा गळ्यास गोऱ्या
करवंदांची माळा चढविल ॥ ४ ॥

असेल कोठें खोल दरींतुन
कालवलेलें काजळ काळें
दृष्ट तुला लागेल कुणाची
लाव बोट गालावर इवलें ॥ ५ ॥

ये येशिल तर अशीच ये तूं
असेन मी जेव्हां बसलेला
आकाशाच्या चौपाटीवर
गंगेमध्यें पाय सोडुनी ॥ ६ ॥
असेल जवळी माझी प्रतिभा
( नकोस मत्सर मनांत आणू ! )
ह्या ताऱ्यांचे खडे टपोरे
पाण्यावरती हलके उडवित ॥ ७ ॥

■ ■

## ३६ : एकटा

माझें उजाड जीवन
नाहीं मायेचा ओलावा
जीर्ण पडक्या भिंतीना
नाहीं सोनेरी गिलावा ! ॥ १ ॥
दुःख डोंगराएवढें
नाहीं सीमेचे बंधन
वर हिरव्या सुखाचें
कोठे दिसेना वसन ! ॥ २ ॥
माझ्या मनाची बकरी
मूक रुदन करिते
दुःख डोंगरावरती
सुःख हुंगत फिरते ! ॥ ३ ॥ ■ ■

## ३७ : आम्हीं पुत्र सागराचे

आम्हीं पुत्र सागराचे
नभास भिडवुं ध्वज हातांतिल भारत किर्तीचे
अफाट सागर पसरे धरती
निळ्या आईची माया वरती
तमांत ठेऊं उजळत माथा वारस ध्रुवाचे
आम्हीं पुत्र सागराचे ॥ १ ॥

बिजलीची तलवार कटीला
ढाल नभाची सज्ज पाठीला
झंझावातहि धरूं थोपवुन कोट करुनी छातीचे
आम्हीं पुत्र सागराचे ॥ २ ॥

आरमार मोठे आंग्र्याचे
पाय उखडले परकियांचे
जीवंत आम्हीं जणुं पवाडे त्या इतिहासाचे
आम्हीं पुत्र सागराचे ॥ ३ ॥

रक्ताचा शेवटला बिंदू
सामर्थ्याचा अफाट सिंधू
लढतां लढतां मरुं करूनिया उंबरठे देहाचे
आम्हीं पुत्र सागराचे ॥ ४ ॥

श्री ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. 92060

जीवन असले जरि क्षणभंगुर
जात असे अमुची दुर्वांकुर
मेलेल्यांची स्फूर्ति घेऊनि बनतिल वीर उद्यांचे
आम्हीं पुत्र सागराचे ॥ ५ ॥

बॉंब, विमानें हे रणगाडे
मानवतेचे चित्र नागडे
उंच हिमालय झुकेल ना कधि मस्तक भारतभूचें
आम्हीं पुत्र सागराचे ॥ ६ ॥

■ ■

## ३८ : आक्रोश

युगे अठ्ठावीस उभा
देत दिलासा मनास
तुझ्या शपथे खातर
नाहीं बदलली कूस ॥ १ ॥

नको मला देवपण
नको रुप सुवर्णाचें
कसें कळेना तुला रे
दिस गेले पुंडलिकाचे ॥ २ ॥

कुणासाठीं किती साहूं
आतां राहिलें ना त्राण
तुझ्यासाठीं अडकला
कंठातून जातां प्राण ॥ ३ ॥

■ ■

## ३९ : आई

विठ्ठलाच्या मंदिरांत
विटेवर देव राहे
माझ्या हृदयमंदिरीं
तुझी मूर्ती वसताहे ॥ १ ॥

टाळ मृदंग वाजत
झाली देवाची आरती
माझ्या हृदयमंदिरीं
तुझ्या प्रेमाची ये स्मृती ॥ २ ॥

देवापुढें लावियल्या
कापुराच्या पंचारती
माझ्या हृदयीं देवाला
उजळती स्नेह-ज्योती ॥ ३॥

मूर्ती संगमरवरी
गळां सुमनांच्या माळा
तुझ्या देहाला पवित्र
अर्पितो मी अश्रूमाळा ॥ ४ ॥

चार नारळाच्या फोडी
सान थोरांना मिळाल्या
तुझ्या गोड आठवणी
माझ्या ओठीं उमटल्या ॥ ५ ॥

मूर्तीवांचुनी कां येई
देव्हाऱ्याला मोठेपण
तुझ्यावांचुनी कां लाभे
मला सुखाचें जीवन ॥ ६ ॥

ऐकूं आली विठ्ठलाला
भक्त दामाजीची साद
ऐकूं येतो कां ग माझ्या
आर्त हृदयाचा नाद ॥ ७ ॥

येग येग लवकरी
विठू महाराचे परी
वाट पाहतो मी तुझी
तृषीत चातकापरी ॥ ८ ॥

## ४० : गाडीवान दादा

गाडीवान दादा, गाडी धीरे चालुं दे
माहेराचा ठेवा डोळे भरुन पाहूं दे ॥ धृ ॥

घर जाई मागें, होई दिसेनाशी आई
इवलेसे हात करि 'टाटा' मला भाई
एकदांच मागें मला वळुन पाहूं दे
गाडीवान दादा, गाडी धीरे चालुं दे ॥१॥

म्हातारा हा वड माझा आयुष्याचा साथी
पारंब्यांचा झुला केला नाजुक ह्या हाती
जातां जातां शेवटचा झोका घेऊं दे
गाडीवान दादा, गाडी धीरे चालुं दे ॥२॥

विहीर ही इथें रोज भरते मी पाणी
पहाटेस इथें गाते गाणीं रातराणी
कण्हणाऱ्या रहाटाचें दुःख जाणुं दे
गाडीवान दादा, गाडी धीरे चालुं दे ॥३॥

दंवबिंदू थांबलेत अजुनि पिकांवरी
अश्रू जणुं सांगतात नको जाऊं पोरी
थांब मला समजुत त्यांची घालुं दे
गाडीवान दादा, गाडी धीरे चालुं दे ॥४॥

आली माझी शाळा बालपण आठवलें
चिंचा दातांनीं तोडतां तोंड रे आंबलें
मारकुट्या मास्तरांचा मार खाऊं दे
गाडीवान दादा, गाडी धीरे चालुं दे ॥५॥

गाडी आली सीमेवर. गांवहि संपला
चंद्रकळेचा हा शेव ओलाचिंब झाला
माहेराचा ठेवा पदराला बांधुं दे
गाडीवान दादा, गाडी धीरे चालुं दे ॥६॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वामित्व.
अनुक्रम ...३३०५४४... दि: ...३।८।२...
क्रमांक ...१४५४६४... नोंद दि: ...
२२।५।८२

## ४१ : देव्हारा

आहे त्यांची मूर्ती माझ्या देव्हाऱ्यांत
रोज लावितो मी तेथें फुलवात ॥ध्रु॥

विटेवर विठू त्यानें घडविला
वाळवंटी मेळा संतांचा दाटला
टाळ मृदंगांचा चालला गजर
हारांचा झालासे विठ्ठलाशीं भार

पुंडलीक येथें रंगला सेवेंत
रोज लावितो मी तेथें फुलवात ॥१॥

धनुंतून सुटे शद्बवेधी बाण
बोल अखेरचा झालें रामायण
खांद्यावर त्याची घेतली कावड
सेवा करण्याची लाविली आवड

पाठीशी श्रावण ऊभा धीर देत
रोज लावितो मी तेथें फुलवात ॥२॥

येथें नाहीं सीता, येथें नाहीं राम
गाभाऱ्यांत परी घुमे रामनाम
येथें आहे मूर्ती जटायु पक्षाची
सेतू बांधणाऱ्या सोनेरी खारीची

स्वागताला पुढे शबरिचा हात
रोज लावितो मी तेथें फुलवात ॥३॥

येथें आहे माता, तरलेलीं गाथा
घडविणाऱ्यांची ऐका येथें कथा
माझेंहि जिवन घडविलें त्यांनीं
म्हणुनी लागलों तयांच्या पूजनीं
लोखंडाचें झालें सोनें देव्हाऱ्यांत
रोज लावितो मी तेथें फुलवात ॥४॥

■ ■

## ४२ : पाय फुटले डोळ्यांना

आंधळ्याचा पाय पडे
पांगळ्याच्या पोटावर
दोन दुःखी एक झाले
आयुष्याच्या वाटेवर ॥ १ ॥

हात गुंफुनि गळ्यांत
रात्र दिसाला भेटली
काळें जग उजळलें
पृथ्वी चालाया लागली ॥ २ ॥

आंधळ्यानें पांगळ्याला
बसविले पाठीवर
पाय फुटले डोळ्यांना
झालें जीवन सुकर ॥ ३ ॥

■ ■

## ४३ : हिरवी पाती

आज अचानक दुर्दैवाची कोसळलीच कुठार
हिरव्या तृणपात्यांना आतां उरला ना आधार ॥ ध्रु ॥
खांबहि खचले दाहि दिशांचे
बंधन सुटले निळ्या नभाचें
क्षणांत लाही लाही झालें रत्नांचे भांडार
हिरव्या तृणपात्यांना आतां उरला ना आधार ॥ १ ॥
अंगावरची हिरवी हिरवळ
सोनेरी त्यावरची मखमल
तुझेच होते सारे कांहीं रंग, रुप, आकार
हिरव्या तृणपात्यांना आतां उरला ना आधार ॥ २ ॥
पिवळी धमक पडतां काया
वरुनी ओतली ज्यांनीं माया
त्या मेघांचा निळ्या नभांतरी स्वैर कुठे संचार
हिरव्या तृणपात्यांना आतां उरला ना आधार ॥ ३ ॥
पायतळीं मुरगळतां माना
किती सोसल्या दुःख यातना
कर उंचावुनि कुणा करावी अंतरिची तक्रार
हिरव्या तृणपात्यांना आतां उरला ना आधार ॥ ४ ॥
पिताच गेला, वैभव गेलें
अनाथ झालीं हिरवीं बाळें
नवरत्नांचा कुठला आतां अंगावर शृंगार
हिरव्या तृणपात्यांना आतां उरला ना आधार ॥ ५ ॥

# ४४ : कुंजवनीं वाजते बांसरी

कुंजवनीं वाजते, बांसरी कुंजवनीं वाजते
गुलाब फुलतो हंसऱ्या गालीं राधा मनीं लाजते ॥ धृ ॥

अवखळ वाहे यमुनेचे जल
घडा रिता हा आज उतावीळ
मातीवरचे घसरें पाऊल
अर्धा भरला घडा राधिका डोईवर ठेविते
कुंजवनीं वाजते, बांसरी कुंजवनीं वाजते ॥ १ ॥

कुंजवनांतील झाडेवेलीं
राधेला ती परकी झाली
लपंडाव खेळाया सजली
वाऱ्यावरती स्वार होऊनी नजर कुणा शोधिते
कुंजवनीं वाजते, बांसरी कुंजवनीं वाजते ॥ २ ॥

गोफणींतुनी खडा निसटला
डोईवरचा घडा भंगला
देह जणुं हा विडा रंगला
धुंद जिवांचा 'ताज' राधिका कांठावर बांधिते
कुंजवनीं वाजते, बांसरी कुंजवनीं वाजते ॥ ३ ॥

■ ■

## ४५ : मैलाचा दगड

उभा एकला रस्त्यांत । वाट कोणाची पाहसी ॥
नाहीं अजुनि मिळाला । जिवा भावाचा सोबती ॥१॥
गेल्या श्रावणांत आलों । तेव्हां सोनेरी सरींत ॥
तुला पाहिला न्हातांना । ओलाचिंब निथळत ॥२॥
आज हिंवाळा कडक । गारठली ही सडक ॥
परि ऊभी आहे तुझी । तनु इवलाली ताठ ॥३॥
कां रे साहावते तुला । उन्ह, पावसाची सर ॥
कां रे रहावते तुला । ऊभें गारठ्यांत गार ॥४॥
बघ हळवा पिंपळ । धरि तुझ्यावर छाया ॥
पानें गाळुनी दाखवी । जणुं अंतरीची माया ॥५॥
तुला हंसविण्यासाठीं । वर आलीं तृणपातीं ॥
तुझ्या भोंवतालीं सारीं । फेर धरुनि नाचतीं ॥६॥
साऱ्या जगाच्या विरुद्ध । उरीं धरुनि अबोला ॥
ऊभा रस्त्याच्या कडेला । कां रे असा तूं एकला ॥७॥
हरवली कां रे तुझी । वाटेंतील सोबतीण ॥
लाल मातींत शोधिशी । तिच्या पावलांची खूण ॥८॥
कोणी असेल येणारें । त्याच्या सुगंधी स्मृतींत ॥
नाद ऐकत बैससी । प्राण आणुनी डोळ्यांत ॥९॥

■ ■

## ४६ : मीरा नाचे मंदिरांत

चोर पाऊलीं येऊन
वीणा माझी छेडिलीस
अंग अंग तृप्त झालें
स्वर होतां मोरपीस ॥ १ ॥

तूंच जुळविल्या तारा
सूर दिलेस लावुन
गीत ओठांत भिजतां
का रे गेलास निघून ॥ २ ॥

वीज बोटांत थिजली
कंप सुटला तारांना
सूर बदसूर झाले
झाली जखम स्वरांना ॥ ३ ॥

तुझ्या स्मृतीचें घुंगुर
आज बांधुन पायांत
वीणा धरुन उराशीं
मीरा नाचे मंदिरांत ॥ ४ ॥

■ ■

## ४७ : जनी एकली दळतें

आलें कली युग आलें। आणि सरली पुण्याई ॥
घट पापाचे भरले। आज ज्याच्या त्याच्या डोई॥१॥

आतां नाहीं दिसायची। श्रावणाची ती कावड ॥
आई-बापांची करण्या। सेवा नुरली आवड ॥२॥

आतां ठकतो कबीर। शेला विणतां विणतां ॥
चाळवितों गतस्मृती। आंसू टिपतां टिपतां ॥३॥

शबरीची उष्टी बोरें। जाती तशीच सुकून ॥
आंसू भिजवी पापणी। वाट रामाची पाहुन ॥४॥

ऊभा दाराशीं विठ्ठल। भुकलेल्यांच्या रुपाने ॥
कड्या कुलुपे ठोकली। कोठारांस दामाजीने ॥५॥

आलें कलीयुग आलें। आणि सरली पुण्याई ॥
घट पापाचे भरले। आज ज्याच्या त्याच्या डोई॥६॥

आम्हीं बांधिले मंदिर। विटा आणि दगडांचे ॥
केले गाभारीं बंदिस्त। देव सारे त्रैलोक्याचे ॥७॥

आतां दगडाचा देव। सारें कांहीं दुःख साही ॥
जनी एकली दळते। विठू विटेवर राही ॥८॥

■ ■

## ४८ : माड खुळा

माड खुळा, माड खुळा
ऊंच भिडला ढगांशीं
गुज मनिंचें सांगतो
आणि तिथुन नभाशीं ॥ १ ॥

नभ दिसाच्या कुशींत
ऊब उरींची चाखतें
रात होता महालांत
साथ चंद्राची करिते ॥ २ ॥

मिठी घालुनि पायांशीं
माती जागत बसली
वर आकाश हसतें
खाली पापणी भिजली ॥ ३ ॥

माड खुळा, माड खुळा
साद नभाला घालतो
ओल्या मातीच्या प्रितीला
पायाखालीं तुडवितो ॥ ४ ॥

■ ■

## ४९ : पदर

होता अवखळ तेव्हां
केलें कौतुक साऱ्यानीं
किती घायाळ जाहले
तुझ्या लटक्या माऱ्यांनीं ॥ १ ॥

तुला लाभतां सौभाग्य
घर एक उजळलें
हात तुझा परिसाचा
सोनें लोखंडाचें झालें ॥ २ ॥

पुरे झाले नऊमास
वेदनेला अर्थ आला
बाळ झोंबतां स्तनांशीं
जीव गंगेंत बुडाला ॥ ३ ॥

आज तुझ्या स्कंधावर
भार उद्यांच्या जगाचा
तुझ्या बोटांस धरून
काळ चाले भविष्याचा ॥ ४ ॥

## ५० : कवडसा

तुझ्या तारुण्याचा ताज
बंद आरसेमहालीं
संयमाच्या दाराला ग
रुढी अडसर घाली ॥१॥

साद कशी तुला घालूं
शीळ मेली ओठावर
लोक म्हणतील कांहीं
कान त्यांचे वाऱ्यावर ॥२॥

पिंपळाच्या पारंब्यांचा
झोला स्मृतींना जागवी
पारावर भातुकली
खेळ खेळाया बोलावी ॥३॥

यौवनाच्या उंबऱ्याशीं
फुटे स्मृतींचा आरसा
निरागस जीवनाचा
आंत हंसे कवडसा ॥४॥

■ ■

## ५१ : ‘ अमरात्म्यानों ! ’

टिळा लाविला मस्तकावरी
धगधगत्या राखेचा जेव्हां
माझेंही कर्तव्य कांहिंसें
मनास माझ्या पटलें तेव्हां ॥ १ ॥

जगण्याच्या पणतींतुन तेवे
त्यागाची तुमच्या रे ज्योती
प्रकाश डवरे मनांमनांतुन
तारे सरकति क्षितिजावरती ॥ २ ॥

भाग्य न माझें अमरात्म्यानों
हांसत वीरासम मरण्याचें
रक्त परी वाहे धमन्यांतुन
सहोदरांच्या आकांक्षेचें ॥ ३ ॥

डोळ्यांचा बसवीन पहारा
उभारीन ह्रदयांच्या भिंती
अशीच अक्षय अखंड ठेविन
तेवत ही ध्येयाची ज्योती ॥ ४ ॥

■ ■

## ५२ : सीमेवर

आयुष्यामधली पुण्याई
झाली ती अश्रूंची गंगा
चौघांच्या बसुनी खांद्यावर
भगिरथ आला इथेंच नंगा ॥१॥

ह्या सीमेवर येता दिंडी
मृदुंगांतला नाद हरवला
मायेच्या शेवाळाकांठीं
प्रवाह गंगेचा अडखळला ॥२॥

दादा, आई, भाऊ, ताई
सगे सोयरे उभे सीमेवर
सती जावया सिद्ध जाहली
फक्त साउली आज सीमेवर ॥३॥

डोळ्यांदेखत जळतो आहे
आयुष्यांतिल शेवटचा क्षण
टिळा लावुनी त्या रक्ताचा
सीमेवरुनी परतें जीवन ॥४॥

■ ■

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वाधमत.
अनुक्रमांक ३३६५० दि: ३।५१
क्रमांक ६७ १५७५ नोंद दि २२।५५

## ५३ : जीवन

आग उन्हाची फुलवित येई
कण वाळूचे तप्त निखारे
राखेवरती फुंकर घालित
उगाच फिरते पिसाट वारे !

पाय न ठरतो वाळूवरती
अंगाची हो लाही लाही
उरीं क्षुधेला फुटतो डोळा
दूर कुठेतरी मृगजळ पाही !

मृगजळांतले तें फसवे जल
ओॲसिसच्या रुपांत हंसतें
अणुरेणूला फुटती जिव्हा
आत्म्याची अन् तहान शमते !

दिवसभराचे वाहुन ओझें
श्रमते, दमते, मरते, मन्मन
तुझ्या स्मृती-ओॲसिसपाशीं
मिळे तया उद्यांचें जीवन !

■ ■

## ५४ : दुपार

पाणवठ्याशीं खडकावरती
ग्रीष्मामधली दुपार कण्हते
तिच्या उरींची व्यथा जाणुनी
पायाशीं पाणी खदबळतें ॥ १ ॥

आगीचे शर झेलित झेलित
पक्षांचीं परतलीं विमानें
झाडांवरची सरली कुजबुज
सरलें संगित, मेलीं पानें ॥ २ ॥

ससे साउलीचे घाबरले
बसले झाडांना ओठंगुन
खट्याळ वारा भिववी त्यांना
पानांची हळू खोडी काढुन ॥ ३ ॥

तव विरहाची दुपार कण्हते
जुन्या स्मृतींच्या पाणवठ्याशीं
तिथें मनाची भरते घागर
भिती सशांची धरुनि उराशीं ॥ ४ ॥

■ ■

## ५५ : पृथ्वी निघाली थाटांत

आज सूर्याला भेटण्या
पृथ्वी निघाली थाटांत ॥ ध्रृ ॥

तिनें ग्रिष्माची दुपार
साडी पिवळी नेसली
लाल आगिच्या पट्ट्यांची
चोळी अंगांत घातली
खळाळत्या निर्झरांचा
चाळ बांधुनि पायांत
पृथ्वी निघाली तालांत ॥१॥

पेटलेल्या निखाऱ्यांची
कानांतून कर्णफुलें
इंद्रधनुची रेखीव
वेणी वेणीवर झुले
लकाकत्या बिजलीची
नथ फांकडी नाकांत
पृथ्वी निघाली झोकांत ॥२॥

शुक्र–चांदणी लाजरी
भाळावर गंधटिळा
सप्तऋषिंच्या रत्नांचा

हार भूषवितो गळा
चांदण्यांचा बाजुबंद
खोल रुतला दंडांत
पृथ्वी निघाली स्वप्नांत ॥३॥

नव्या नवसाची पोर
दृष्ट लागेल कुणाची
तिनें घेतली ओढणी
पुनवेच्या आकाशाची
अवसेच्या काजळाचें
गालावर गालबोट
पृथ्वी निघाली थाटांत ॥ ४ ॥

■ ■

क्र. १२७६०

REFBK-0012760

REFBK-0012760

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्वक्रम
मनुक्रम ३३६८७० दि: ३।८।७
क्रमांक १५५४० ग्रं. दि. २२।११।६२